# जनसंपर्क विभाग

जळगाव दि. १३ (प्रतिनिधी) जळगाव, धुळे व नंदुरबार या तीन जिल्ह्यातील ज्या ज्येष्ठ नागरीक संघांना आपल्या संघातील सदस्य अथवा परिसरातील ज्येष्ठ नागरीकासांठी समुपदेशकांच्या नि:शुल्क प्रत्यक्ष भेटी आयोजित करावयाच्या आहेत त्यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाकडे प्रस्ताव पाठवावा असे आवाहन करण्यात आले आहे.

आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने विद्यापीठ परिक्षेत्रातील ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. या कार्यक्रमांमधून ज्येष्ठ नागरिकांमध्ये अनेक समस्या असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामध्ये एकाकीपणा, नैराश्य, दु:ख, स्मृतीभ्रंश, फसवणूक, आजारपण, नकारात्मकता अशा विविध बाबींचा समावेश आहे. त्यामुळे या विभागाने 'समुपदेशक आपल्या दारी' हा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या उपक्रमाद्वारे समुपदेशक प्रत्यक्ष भेटीतून ज्येष्ठ नागरिकांचे समुपदेशन करणार आहे. हे समुपदेशन नि:शुल्क राहणार आहे. जळगाव, धुळे व नंदुरबार या तीन जिल्ह्यातील ज्या ज्येष्ठ नागरिकसंघांना समुपदेशकांच्या भेटीचे आयोजन करावयाचे आहे त्यांनी पत्राद्वारे किंवा ई-मेल द्वारे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेला अर्ज भरून पाठवावयाचा आहे. योग्य त्या प्रस्तावांना मान्यता दिली जाईल. अशी माहिती या विभागाचे संचालक प्रा. आशुतोष पाटील यांनी दिली.

---

जा.क्र.: कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: १३ जुलै, २०२३

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी